प्रेसनोट दि. १३/०५/२०१९

दि. ०६/०५/२०१९ ते १२/०५/२०१९ या आठवडा कालावधीतील सायबर क्राईम पोलीस स्टेशन, पुणे शहर येथील प्राप्त तक्रारी अर्जातील डेबीट / क्रेडीट कार्ड फ्रॉडचे बाबतीत अर्जदाराची फसवणुक झालेली रक्कम रुपये १,२९,१८१/- अर्जदार यांना रिफंड करण्यात आली.

सायबर क्राईम पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे तक्रारी अर्जापैकी डेबीट / क्रेडीट कार्ड फ्रॉडचे बाबतीत अर्जदाराची फसवणुक झालेली रक्कम जर माहिती (ओटीपी) शेअर केला गेला असेल तर बँकेकडून सदर रक्कम रिफंड केली जात नाही. अशा प्रकारच्या अर्जामध्ये पैसे विविध मर्चंट / वॉलेट पैसे गेले असतात सायबर सेल, संबंधित मर्चंट / वॉलेट यांना मेलद्वारे पत्रव्यवहार करुन अर्जदार यांना त्याची रक्कम रिफंड करुन दिली जाते.

दुस-या प्रकारात ओटीपी शेअर केला नसेल किंवा अर्जदार यांचे डेबीट / क्रेडीट कार्ड त्याच्या ताब्यात असताना सुध्दा त्याच्या खात्यावरील रक्कम काढली जाते अशावेळी सायबर क्राईम पोलीस स्टेशन मार्फत त्याची रक्कम परत मिळवुन देण्यासाठी आणि पुढील अर्ज चौकशीसाठी मेलद्वारे सदर बँकेला पत्रव्यवहार केला जातो. अशा वेळी ठराविक दिवसानंतर अर्जदार यांची रक्कम संबंधित बँकेमार्फत किंवा मर्चंट/वॉलेट द्वारे अर्जदार यांचे अकाउंटला परत केली जाते. अशाप्रकारे एका अर्जात अर्जदार विनीत परमार यांच्या क्रेडीट कार्डवरुन अनधिकृत व्यवहार होवुन त्याची ५५,२२४/- रुपयाची आर्थिक फसवणुक केली होती. सदर बाबत तात्काळ ॲक्सीस बँकेशी पत्रव्यवहार करुन त्याची गेलेली संपूर्ण रक्कम रिफंड करण्यात आली. तसेच अर्जदार नामे संदीप वेदी हे यांचे ३८,९२७/- रु हे कोटक महिंद्र बँकेला पत्रव्यवहार करुन रिफंड करण्यात आली आहे. सदर बाबत तात्काळ पत्रव्यवहार करुन अर्जदार यांची गेलेली संपुर्ण रक्कम रिफंड करण्यात आली. तसेच अर्जदार नरहरी घावटे यांचे डेबीट कार्ड त्यांचेजवळ असताना त्याच्या डेबीट कार्डवर अनधिकृत ट्रॅन्झॅक्शन होवुन त्याची २८,०००/- रुपयांची आर्थिक फसवणुक झाली होती सदरबाबत तात्काळ पत्रव्यवहार करुन एसबीआय बँकेकडुन अर्जदार यांना संपुर्ण रक्कम रिफंड करण्यात आले. तसेच अर्जदार नामे सचिन खुराना यांनी त्यांना टुव्हीलर गाडी घेण्यासाठी आलेक्स वर ॲड पाहून गैरअर्जदार यांना पेटीएम दवारे २४९८/- रुपयाची आर्थिक आर्थिक फसवणुक झाली होती सदरबाबत तात्काळ पत्रव्यवहार करुन अर्जदार यांची गेलेले संपुर्ण रक्कम रुपये रिफंड करण्यात आली. सदरची कामगिरी मा. पोलीस उप आयुक्त संभाजी कदम, सहायक पोलीस आयुक्त निलेश मोरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राधिका फडके यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर क्राईम पोलीस स्टेशन, पुणे शहर मधील अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.

पोलीस उप-आयुक्त
आर्थिक व सायबर गुन्हे, पुणे शहर

Scanned by CamScanner